७. रसचर्चेच्या विषयाला सुरुवात करताना बापट म्हणतात की, नाटकाचे संविधानक, पात्रांचे शील, मनोरंजकत्व इ. सगळ्यांचा विचार म्हणजे नाटकाच्या निर्जीव अंगाचा विचार. नाटकाच्या इमारतीला सजीवता येते ती त्यातील रसामुळे ! श्राव्यकाव्यापेक्षा दृश्यकाव्यात रसोत्पत्तीला अधिक स्थान असते असे सांगून संस्कृत साहित्यातील रसविचार मांडला आहे आणि ‘शाकुंतल’ च्या संदर्भात आलंबनविभाव उद्दीपन विभाव, व्यभिचारीभाव स्पष्ट करुन पूर्ण रसोत्पत्ती ‘शाकुंतल’ मध्ये कशी होते ते सांगितले आहे. रसोत्पत्तीच्या बाबतीत नाटककार, नट, सीन-सीनरी, स्टेज मॅनेजर हे सगळे घटक महत्वाचे असतात हा विचार व्यक्त केला आहे. खरा रस म्हणजे शुध्द रस. याचे आलंबनविभावादी शुध्द असतात. जिथे हे खरे स्वरुप नसेल तेथे रस नसून रसाभास असतो. रती, शोक, निर्वेद, क्रोध, उत्साह, विस्मय, हास, भय, जुगुप्सा हे विकार प्रत्येक मनुष्याच्या हृदयात बीजरुपाने सिध्द असतात. या विकारांना ‘स्थायीभाव’ म्हणतात. या विकारास चलन देऊन वर दिलेल्या चित्तवृत्ती उत्पन्न होण्यास काही गोष्टी कारणीभूत व्हाव्या लागतात. या गोष्टींपैकी काही आश्रयरूप व काही उद्दीपनरूप असतात. या कारण होणाऱ्या गोष्टीस ‘विभाव’ असे म्हणतात. आश्रयरूप गोष्टीस आलंबनविभाव व उद्दीपन गोष्टीस ‘उद्दीपन विभाव’ असे म्हणतात. या दोन कारणांनी रती इ. विकारांना चलन मिळाले म्हणजे स्तंभ, प्रलय, रोमांच, स्वेद, अश्रु, वैस्वर्य (स्वर बदलणे) वैवर्ण्य (रंग पालटणे) आणि कंप इत्यादी कार्ये होतात. या कार्यास ‘अनुभाव’ किंवा ‘सात्विकभाव’ असे नाव दिले आहे. या कार्योत्पत्तीला निर्वेद, ग्लानी, शंका, असूया, मोह, स्मृती इ. चे साहाय्य मिळते. या भावांना व्यभिचारीभाव असे म्हणतात. म्हणजेच विभाव, अनुभाव व व्यभिचारीभाव यांनी हृदयात व्यक्त झालेला जो स्थायीभाव त्याला रस असे म्हणतात. हे रस नऊ आहेत. शृंगार, करुण, शांत, रौद्र, वीर, अद्‌भुत, हास्य, भयानक, व बीभत्स.

संस्कृत साहित्यशास्त्रातील हे विवेचन मांडून श्री. बापट यांनी ‘शाकुंतल’ च्या संदर्भात या पारिभाषिक संज्ञा स्पष्ट केल्या आहेत. —

दुष्यंताच्या नजरेस शकुंतला पडते शकुंतला - आलंबनविभाव.

तिचे अप्रतीम लावण्य, आश्रमवत् शोभा, शकुंतलेच्या एका मागून एक वाढत्या प्रमाणावर होणाऱ्या लीला व हळूहळू ती दुष्प्राप्य नाही असे कळत जाणे या गोष्टींनी रतीस मिळालेल्या चलनास उद्दीपन मिळते म्हणून या गोष्टी म्हणजे उद्दीपनविभाव.

असे झाले म्हणजे रोमांच, वैस्वर्य, वैवर्ण्य कंप इ. कार्ये त्याच्या ठिकाणी दृश्य होतात. हे अनुभाव होत. हे सर्व चालले असताना मधून-मधून शंका, हर्ष, आवेग, चापल्य, गर्व, विषाद, औत्सुक्य, वितर्क येऊन आपापल्या परीने मदत करुन जातात हे व्यभिचारी भाव होत.

या सर्वांच्या एकवटण्याने रती या भावास जे रुप येते तो शृंगाररस होय.

श्री. बापट सांगतात की, रसासंबंधीचे हे विवेचन एका पात्रासंबंधाने लागू आहे. रंगभूमीवर कधी एक पात्र असते, कधी अनेक पात्रे असतात व याशिवाय सर्व सभाजन मिळून एक व्यक्ती अथपासून इतिपर्यंत हजर असते. रंगभूमीवर असणाऱ्या पात्रांमध्ये कधी एकच रस उत्पन्न होतो, तर कधी भिन्न-भिन्न रस उत्पन्न होतात. तसेच रंगभूमीवरील पात्रामध्ये जो रस उत्पन्न होतो तोच कधी सभाजनांमध्ये व्यक्त होतो तर कधी सभाजनांमध्ये वेगळाच रस उत्पन्न होतो. उदा. शाकुंतलच्या चवथ्या अंकात जी पात्रे आहेत त्या सर्वात करुणरस व्यक्त होतो व सभाजनातही तोच रस व्यक्त होतो. पण पाचव्या अंकात दुष्यंत, शकुंतला, शिष्य, गौतमी या पात्रात एकच रस व्यक्त होत नाही. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, शकुंतलेच्या ठिकाणी करुणरस, शिष्याच्या ठिकाणी रौद्र रस, दुष्यंताच्या ठिकाणी अद्‌भुतरस प्रधान आहे. एकामधील रसोत्पत्तीस दुसरी पात्रे कारण होत आहेत. प्रेक्षकात करुणरस प्रधान आहे.

८. नाटकात काही वेळा वेगवेगळ्या कारणांनी रसभंग होतो. श्री. बापट यांनी याबाबत तीन गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. नाटकातील विदूषकाची योजना अयोग्य स्थानी केलेली असेल तर रसभंग होतो. प्रत्येक नाटकात विदूषकाचे पात्र असलेच पाहिजे असे नाही तसेच विशिष्ट नाटकात विशिष्ट कार्य साध्य होण्यासाठीच विदूषक असावा असा विचार श्री. बापट मांडतात. तसे जर झाले नाही तर अनाठायी हास्यनिर्मिती होऊन रसभंग होतो. ‘शाकुंतल’ मध्ये विदुषकाला विशिष्ट असे स्थान आहे. योग्य तेथेच तो कालिदासाने आणला आहे.

नाटकातील स्वगते किंवा आत्मगत भाषणे हा विषय पुढल्या काळात बहुचर्चित ठरलेला आहे. या विषयाला श्री. बापट यांनी रसभंगाच्या संदर्भात स्पर्श केला आहे. आत्मगत भाषणे

आवश्यक तेथेच असावीत. ती नीरस, लांबलचक, व्याख्यानबाजीच्या स्वरुपातील असू नयेत.

सृष्टिसौंदर्याची व निर्जीव किंवा सजीव वस्तूंची वर्णने ही रसभंगकारक ठरतात. नाटकात वर्णनांना फार क्वचित स्थान असते. दुष्यंताने पहिल्या अंकात शकुंतलेच्या रूपाचे जे वर्णन केले आहे ते योग्य आहे कारण ती प्रथमच त्याच्या दृष्टीस पडल्यामुळे तो थक्क झाला होता. असे मत श्री. बापट यांनी व्यक्त केले आहे, पण पुढे आपण स्वत: कृश झालो आहोत असे जे वर्णन केले आहे ते रसभंगकारक आहे, कारण हा प्रसंग वठवणे नटाला शक्य नाही. काल्पनिक प्रसंग वठवणे नटाला फार कठीण असते. नटाची ताकद व्यर्थ घालवू नये हे चांगले असा आपला स्पष्ट अभिप्राय लेखक व्यक्त करतात.

वेगवेगळ्या व परस्परांपासून फार भिन्न अशा मनाच्या स्थितीची पात्रे एकाच प्रवेशात आणल्यानेही रसभंग होतो असेही ते नमूद करतात.

आपल्या निबंधाच्या अखेरीला नाटकाबाबत फार महत्वाचे विचार त्यांनी तळमळीने मांडले आहेत. नाटक बसवून देणाऱ्याची कुशलता (दिग्दर्शक हा शब्द तेव्हा नव्हता) नजरेस येत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. नाटक बसवून देताना कच्च्या गोष्टीचे शिक्षण देण्याकडे जितके लक्ष दिले जाते तितके लक्ष पात्राच्या वेगवेगळ्या प्रसंगाच्या स्थितीविषयीचे ज्ञान पात्रास समजावून देण्यात दिले जात नाही. पात्रास प्रत्येक प्रसंगातील स्थितीचे हृद्गत समजावून देणे फार जरुर आहे. नटाने आपली भूमिका शिकणे म्हणजे घोड्याने कदम शिकणे किंवा सर्कसमधील जनावरांनी आपापली कामे शिकणे नव्हे असे परखड मत ते देतात.

लोकांचे नाट्याने मनोरंजन करण्याचा धंदा मोठ्या मानाचा समजला जाणे साधारणपणे अशक्यच आहे असे मत देऊन मान मिळविण्यासाठी नाटक करुन दाखविणे ही एकच कसोटी नाही तिच्याबरोबर इतर अनेक गोष्टी लागतात असे सूचित करुन विषय संपवीत आणला आहे.

'शाकुंतल नाटक निबंध' आणि 'नाटकविषयक व्यापक विचार' मध्ये शाकुंतलच्या संदर्भात केलेल्या विवेचना यावरुन श्री. बापट यांच्या अभ्यासातील सखोलता आणि सूक्ष्म विवेचकता स्पष्ट दिसून येते. संस्कृत नाट्यशास्त्रातील मूलतत्वे अभ्यासून पण त्यांचे ओझे न घेता त्यांनी स्वतंत्र दृष्टीने आपले विचार मांडले आहेत. संस्कृतबरोबरच इंग्रजी नाटके आणि साहित्यसमीक्षा यांचा व्यासंगही जागोजाग दिसतो. 'शाकुंतल' वर लिहिताना त्या नाटकाच्या संदर्भातील सर्व सौंदर्यस्थळाचा नाट्यदृष्ट्या विचार इथे मांडलेला दिसतो.

नाटक ही एक 'रचना' आहे. ती एक इमारत आहे. तिच्या बांधणीची काही निश्चित सूत्रे आहेत, तत्वे आहेत आणि असे असले तरी रसात्मकता आणि मनोदर्शन हा त्याचा आत्मा आहे. हा मूलभूत विचार या संपूर्ण विवेचनामागे आहे. सहृदय अंत:करणाला स्पर्श करणे ही नाटकाची कसोटी आहे. प्रयोगानुकूल असा हा कलाप्रकार आहे असे अनेक महत्वाचे मुद्दे या निबंधामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मांडले आहेत म्हणजे विचारांची मूळ बैठक पक्की आहे. 'ङ्गया निबंधलेखनामागील माझी दृष्टी स्वतंत्र आहे.ङ्ग' हा लेखकाचा अभिमान यथार्थ आहे असे म्हणावेसे वाटते. दोन्ही लेखात मिळून लेखकाने शाकुंतल आंतरबाह्य तपासलेले आहे. त्यातील प्रत्येक बारीक-सारीक तपशीलाची आवश्यकता, त्याचे नाट्यदृष्ट्या महत्व हे साधार स्पष्ट केले आहे. यात अभ्यासकाची तटस्थ दृष्टी आहे. आज ज्याला आपण मराठी समीक्षा म्हणतो तशाप्रकारच्या समीक्षेचा जेव्हा जन्म झाला नव्हता, समीक्षेच्या भाषेची जडण-घडण झाली नव्हती त्या काळातले हे लेखन आहे म्हणून यातील बारकावा, रसज्ञता विशेष वाटते. आदर्श स्वरुपाचे कोणतेही समीक्षालेखन त्यावेळी लेखकाच्या डोळ्यापुढे नव्हते.

श्री. बापट यांच्यापूर्वी कालिदासाच्या 'शाकुंतल' वर ज्यांनी लेखन केले होते त्यात विष्णुशास्त्री चिपळूणकर हे प्रमुख होते. संस्कृत नाटकांचा त्यांनी जो परामर्ष घेतला, कविपंचकावर जो निबंध लिहिला त्यामागे भारतीय साहित्य परंपरेची नव्याने आठवण, ओळख करुन देणे, आपल्या श्रेष्ठ साहित्यकृतींबद्दलचा अभिमान जागृत करणे हा हेतू होता. पूर्वजगौरव, अस्मिताजागृती ही चिपळूणकरांच्या लेखनामागील मूलभूत प्रेरणाच इथे प्रबळ ठरलेली दिसते. 'शाकुंतल' या कलाकृतीचे सौंदर्य उलगडून दाखविणे हा त्यांचा हेतू नव्हता. श्री. बापट यांनी आस्वादकाच्या भूमिकेतून या कलाकृतीचे सौंदर्यग्रहण केले हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांची दृष्टी स्वतंत्र आहे. ती या अर्थाने.

श्री. बापट यांच्या परीक्षणलेखाचा प्रारंभ पारंपारिक पद्धतीने झालेला आहे. प्रथम मुळातील कथानक सांगणे, मग मूळ कथेतील बदल आणि त्या बदलांमागील कारणे अशा पध्दतीनेच ते पुढे जातात. या पद्धतीची सुरुवात चिपळूणकरांच्या परीक्षणलेखांपासून झाली होती. श्री. बापट यांचे वैशिष्ट्य हे की, ते एवढ्यावरच थांबत नाहीत. नाटकातील इतर अनेक घटकांचा नव्या दृष्टिकोनातून विचार करतात.

नाटकाच्या कथानकात त्यांनी जो बदल सुचविला आहे, त्यामध्ये त्यांची वेगळी दृष्टी आहे. दुष्यंत हा राजपुरुष नसून राजा आहे, हे विवाहानंतर शकुंतलेला कण्वमुनींकडून कळायला हवे होते असे त्यांचे प्रतिपादन आहे. विवाहानंतर ही गोष्ट कळल्याने शकुंतलेला आणि तिच्या सख्यांना आनंद आणि अभिमान वाटला असता पण त्यामुळे तिला दुष्यंताच्या भेटीमुळे झालेला आनंद किंवा पुढे पाचव्या अंकात झालेले दु:ख यात काही फरक पडत नाही. पहिल्या अंकात शकुंतलेचे सौंदर्य दृष्टीस पडल्यावर दुष्यंत म्हणतो.

असंशयं क्षत्रपरिग्रहक्षमा ।
यदार्यमस्यामभिलाषि मे मन: ।
सतां हि संदेहपदेषु वस्तुषु ।
प्रमाणमन्त:करणप्रवृत्तय: ॥

ही क्षत्रियकन्याच असली पाहिजे त्याखेरीज माझं मन हिच्यावर जडणार नाही असा अभिमान दुष्यंताच्या बोलण्यातून व्यक्त होतो आणि तो खराही ठरतो. शकुंतलेच्या बाबतीत असा काही प्रकार नाही. कामविव्हल शकुंतलेला दुष्यंत हा राजपुरुष आहे की राजा आहे असा काही प्रश्न पडत नाही. कण्वमुनींनी सुध्दा शकुंतलेला अनुरूप वराला देण्याचा संकल्प केला आहे असे प्रियंवदा सांगते. अनुरूप वर हा राजाच असला पाहिजे असे कोठेही सूचित केलेले नाही. पाचव्या अंकात राजाने शकुंतलेचा अव्हेर केला त्यावेळी शकुंतला त्याला खरमरीत उत्तर देऊ शकली असती असे श्री. बापट म्हणतात, पण दुष्यंताने खोटे बोलून कार्यारंभ केला हे सत्य राहातेच. दुष्यंत, राजा ऐवजी राजपुरुष असता तरी शकुंतला त्याच्या वागण्याबद्दल तीव्र निषेध व्यक्त करू शकत होतीच.

सातव्या अंकात दुष्यंताच्या भेटीनंतर शकुंतलेच्या मनाची आंदोलने कालिदासाने चित्रित करायला हवी होती असे श्री. बापट यांनी म्हटले आहे. काव्यदृष्ट्या ती एक सुंदर जागा होती

हे खरे. स्त्रीमनाची हळुवार स्पंदने श्री. बापट यांनी अचूक जाणली आहेत, पण कालिदासाने ही जागा उगीच सोडली असेल असे वाटत नाही. दुर्वासाचा शाप, अंगठी हरवणे या घटनांशी राजाच्या विस्मृतीचा संबंध आहे हे कळल्यावर कालिदासकालीन विचारी, सुसंस्कृत प्रौढा, पतीचा अव्हेर करू शकली नसती.

या ठिकाणी 'शाकुंतल' संबंधी रविंद्रनाथ टागोरांनी केलेले विवेचन, त्या मताच्या विरोधी प्रा. वै. का. राजवाडे यांनी व्यक्त केलेले मत आणि प्रा. दि. के. बेडेकर यांनी वै. का. राजवाडे यांच्या मताला दिलेली पुष्टी हे सारे मांडणे योग्य ठरेल. 'शाकुंतल' संबंधी झालेल्या या स्वतंत्र चिंतनातून या कलाकृतीच्या सौंदर्याकलनाच्या कक्षा किती व्यापक आणि विशाल आहेत याचा प्रत्यय येतो.

रविंद्रनाथ टागोर[१९] वै. का. राजवाडे,[२०] प्रा. दि. के. बेडेकर [२१] यांचे 'शाकुंतल' संबंधीचे विवेचन.-

रविंद्रनाथ टागोर यांनी 'कुमारसंभव आणि शाकुंतल' आणि 'शाकुंतल' या आपल्या दोन लेखांमध्ये कालिदासाच्या कृतींवरील आपले भाष्य मांडले आहे. 'कुमारसंभव आणि शाकुंतल' या लेखाच्या सुरुवातीला त्यांनी महाभारत, रामायण आणि कालिदासाच्या कलाकृती यांची तुलना केली आहे. ही दोन्ही महाकाव्ये बाह्यत: 'प्रवृत्ती' चे चित्रण करणारी वाटत असली तरी तिचा अंत:स्त्रोत वैराग्याचा, निवृत्तीचा आहे. भोगातून त्यागाकडे, वादळाकडून शांततेकडे त्यांचा प्रवास आहे. तेच त्यांचे अंतिम ध्येय आहे. कालिदासाचा प्रवासही सौंदर्यलोलुपतेकडून, भोगाकडून त्यागाकडे, वैराग्याकडे आहे. आपल्या काव्याचा शेवट करताना कालिदास कोणत्या भूमिकेवर जाऊन थांबतो याचा विचार हाच रविंद्रनाथांच्या लेखाचा विषय आहे. त्याचप्रमाणे अर्वाचीन आदर्श साहित्याशी कालिदासाच्या काव्याची तुलना करणे हाही आहे. 'अर्वाचीन आदर्श साहित्य' या शब्दातून त्यांनी इंग्रजी नाटकांचा संदर्भ सूचित केला आहे. ते म्हणतात, शाकुंतल हे नाटक कालिदासाऐवजी एखाद्या युरोपियन नाटककाराने लिहिले असते तर दुष्यंताला, शकुंतलेचा त्याग केल्याबद्दल पश्चात्ताप झाला इथेच नाटकाचा शेवट केला असता. नायक-नायिकेची कायमची ताटातूट करुन नाटक शोकांत केले असते. कालिदासाने मात्र दुष्यंत-शकुंतलेच्या मंगल मीलनात शाकुंतल समाप्त केले आहे. दुष्यंत-शकुंतलेची परिपूर्ती त्यांच्या प्रथम मीलनात नाही. कठोर तपश्चर्येनंतर झालेल्या पुनर्मीलनात सौंदर्याची खरी शोभा आहे, तिथे

संयम आहे, कृतार्थता आहे, भोगलालसेत कृतार्थता नाही, ‘प्रेमाचे अंतिम ध्येय प्रेमच’ हे तत्व भारतवर्षाच्या पुरातन कवींनी कधीच स्वीकारले नाही. तर मांगल्य हेच प्रेमाचे परमोच्च ध्येय त्यांनी मानले, गौरविले. संसार आणि तपश्चर्या या दोहोंचा समन्वय करणे शक्य आहे. हे कालिदासाने कुमारसंभव आणि शाकुंतल यात दाखविले आहे. रविंद्रनाथांनी कालिदासाच्या कलाकृतींची फलश्रुती विशद केली आहे.

‘शाकुंतल’ या लेखात शेक्सपीअरच्या ‘टेम्पेस्ट’ शी ‘शाकुंतल’ ची तुलना केली आहे. त्याचप्रमाणे गटेने शाकुंतलविषयी जो उद्गार काढला आहे त्याचे मर्म रविंद्रनाथांनी उकलून दाखविले आहे. गटेने म्हटले आहे की, ‘तारुण्य रुपी पुष्पाचे आणि परिपक्व वयरुपी फलाचे मर्त्यलोक आणि स्वर्गलोक या दोघांचेही एकाच वेळी दर्शन घ्यावयाचे असेल तर ते शाकुंतलातच घेता येईल.’

इ. स. १७९२ मध्ये जर्मन कवी गटे याने ‘शाकुंतल’ विषयी जे उद्गार काढले त्याचे ए.इ.एरींुंळलज्ञ यांनी केलेले सुप्रसिध्द इंग्रजी भाषांतर खालीलप्रमाणे आहे.-

‘Wouldst thou the young year 's blossoms and
the fruits of its decline ,
And all by which the sole is charmed, enraptured
feasted fed,
Wouldst thou the earth, and heaven itself in
one sole name combine ?
I name thee, O Shakuntala ! and all at once
is said "

गटेचा अभिप्राय म्हणजे केवळ अतिशयोक्तीने भरलेला आनंदाचा उमाळा नव्हे, तर तो एका रसज्ञाचा खरा अभिप्राय आहे असे नमूद करुन रविंद्रनाथ सांगतात की, मेघदूतात ज्याप्रमाणे पूर्वमेघ व उत्तरमेघ असे भाग आहेत तसेच ‘शाकुंतल’ मध्ये पण पूर्वमीलन व उत्तरमीलन असे प्रकार आहेत. पहिल्या अंकातील मर्त्यलोकावरील चंचल, सौंदर्यमय व विचित्र पूर्वमीलनातून स्वर्गतपोवनातील शाश्वत, आनंदमय उत्तरमीलनात येऊन पोहोचणे म्हणजेच अभिज्ञान शाकुंतल नाटक. शकुंतला ही कोणत्या अर्थाने निसर्गकन्या आहे, तपोवनातील निसर्ग आणि ती यांच्यात अतूट नाते कसे आहे याचा रसास्वाद या लेखात

वाचायला मिळतो. तपोवनातील निसर्गदेवी हे शाकुंतलातील एक पात्र आहे. बाहेरुन निसर्गाला निसर्गच कायम ठेऊन, आतून त्याला इतके सजीव, इतके व्यापक, इतके प्रत्यक्ष करुन त्याचे द्वारा नाटकाचे इतके मोठे कार्य साधणे हे इतरत्र दिसत नाही. इकडे रविंद्रनाथ लक्ष वेधतात. दुष्यंत – शकुंतलेच्या नैसर्गिक उफाळत्या भावनांची परिणती पूर्वमीलनात होते पण हे मीलन देहाचे, अविचार, आवेग, उच्छृंखलपणा हा त्याचा पाया. म्हणून कालिदासाने दुर्वासशापरूपाने त्याची शिक्षा त्यांना दिली. शापामुळे शकुंतला, दुष्यंत दोघेही दोन प्रकारांनी 'आतून' होरपळून निघाले. वंचना, अपमान, जननिंदा यामुळे शकुंतला दीनवाणी झाली तर अंगुलीदर्शनानंतर दुष्यंत पश्चात्तापाने दग्ध झाला. या कठोर तपश्चर्येनंतरचे मीलन हे अग्नीतून तावून – सुलाखून शुध्द स्वरुपात उरलेल्या अस्सल सुवर्णासारखे आहे. हीण, नष्ट झाले. अस्सलता तेवढीच उरली आणि उमगली. पाचव्या अंकात शकुंतलेला राजदरबारात एकटे सोडून तपस्वीजन परत फिरतात तेव्हा काव्याच्या आरंभी ज्या तपोवनाशी शकुंतला देहमनाने पूर्णपणे एकरूप झाली होती. त्याच्याशी तिचा संबंध तुटला. तेथील कोमलता, निर्व्याज प्रेम, सरलता सारे तिच्या जीवनातून हद्दपार झाले. सातव्या अंकात जेव्हा मारीच ऋषींच्या आश्रमात दुष्यंताशी तिचे पुनर्मीलन झाले तेव्हा तिला हरवलेला स्वर्ग परत मिळाला.

Paradise lost and paradise regained . हे दोन्ही एकाच शाकुंतलात पाहायला मिळतात हा रविंद्रनाथांचा अभिप्राय खूप काही सांगून जातो. नवथर तारुण्य संपून परिपक्व झालेल्या मनाच्या, तपाचरणाने व्रतस्थ झालेल्या माता शकुंतलेशी दुष्यंताचे मीलन होते ते पाहून संसाराचा खरा अर्थ उमगतो. 'शाकुंतलची' ही शांत रसातील परिणती हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. इथे कालिदासाने आपल्या पात्रांना आपल्या आंतरिक शक्ती पणाला लावायला लावले आहे. बाह्य दुष्ट, बीभत्स शक्तींच्याकडून त्यांना शिक्षा दिलेली नाही. 'दुर्वासाचा शाप' ही घटना त्याने संयमाने हाताळली आहे. प्रमत्त वृत्तींचे अस्तित्व त्याने मानले पण त्यांना अखेरीला उदात्ततेत नेऊन सोडले. तप, तेज, त्याग यातून येणारे करुणगांभीर्य आपल्याला एका उंचीवर नेते. पुष्पाचे फळात आणि मर्त्यलोकाचे स्वर्गलोकात रुपांतर याचा अर्थ हा आहे.

श्री. गो. वा. बापट यांनी शकुंतलेच्या व्यक्तिचित्रणातील उणीव दाखविताना असा विचार व्यक्त केला आहे की, दुष्यंताचा, मारीच आश्रमात स्वीकार करताना तिला राजाविषयी शंका यायला हवी होती. तो पाया पडत असला म्हणून काय झालं ! पूर्वीही एकदा तो पाया पडला

होताच. याला उत्तर रविंद्रनाथांच्या या विवेचनात मिळते. पश्चात्तापदग्ध अंत:करणाची ओळख तिला पटली कारण एव्हाना तिनेही खूप काही सोसले आहे. कण्व, गौतमी, शारङ्गरव, शारद्वत सारे तिच्या आयुष्यातून दूर गेले कारण तिचे मूळ कृत्य अविचारातून घडले होते याची मनोमन जाणीव तिला झालीच असणार. दुष्यंताच्या प्रेमचिंतनात गुंग होऊन ती गृहस्थधर्म, आतिथ्यधर्म विसरली त्याची शिक्षा तिला मिळाली. ही सारी तपस्या झाल्यावर तिला तशाच तप:पूत हृदयाची, दुष्यंताची ओळख पटली. मधुकरवृत्तीच्या दुष्यंताची शकुंतलेवरची प्रीती ही अस्सल होती. हे त्याचे त्यालाच मधल्या काळात कळले. स्वत:च्या हृदयाची साक्ष पटली. आणि ती पटल्यावरच पश्चात्तापदग्ध दुष्यंताने शकुंतलेचे पाय धरले. तो प्रीतीच्या सात्विक मूर्तीला, कठोर व्रतपालनाला केलेला प्रणाम होता. म्हणून शकुंतलेने त्याचा विनम्र स्वीकार केला. दुष्यंताने धीरोदात्त नायकाने करावा तसा शकुंतलेचा स्वीकार केला. ही गोष्ट तिलाही उंची प्राप्त करुन देणारीच आहे. अन्यथा रविंद्रनाथांनी म्हटल्याप्रमाणे राजसभेत प्रवेश करताच दुष्यंताने शकुंतलेचा स्वीकार केला असता तर असल्या शकुंतलेला फार तर दुष्यंताच्या अंत:पुरातील एका कोपऱ्यात जागा मिळाली असती अथवा हंसपादिकांच्या सैन्यात तिची भरती झाली असती ! आता शकुंतलेला दुष्यंत किंवा दुष्यंताला शकुंतला सहजासहजी मिळालेली नाही. त्यांनी एकमेकांना 'साधना' करुन मिळविलेले आहे. रविंद्रनाथ आपल्याला या विचारापर्यंत पोचवितात.

रविंद्रनाथांच्या या मताशी विरोध दर्शविणारे मत प्रा. वै. का. राजवाडे यांनी कसे व्यक्त केले आहे आणि प्रा. राजवाडे यांचे मत कसे बरोबर आहे ते प्रा. दि. के. बेडेकर यांनी सांगितले आहे.

रविंद्रनाथ आणि प्रा. वै. का. राजवाडे यांच्यातील मुख्य वादाचा मुद्दा दुष्यंत-शकुंतलेच्या स्वभावदर्शनाचा आहे. रविंद्रनाथ टागोर यांच्या एकंदर विवेचनामध्ये असे सिध्द करण्याचा प्रयत्न आहे की, अशुध्द, तारुण्य-सुलभ प्रेमात गुरफटणारी दुष्यंत व शकुंतला यांची मने दु:ख व अनुताप यामुळे प्रगल्भ व शुध्द प्रेमापर्यंत पोचली हे दाखविणे हाच कालिदासाचा हेतू आहे. या उलट प्रा. राजवाडे यांच्या मते दुष्यंताच्या व शकुंतलेच्या वागण्यात प्रथमपासूनच अशुध्द काही नाही व त्यांचे वागणे प्राचीन भारतीय वातावरणाशी सुसंगत आहे. टागोरांनी 'विशुध्द प्रेमाच्या' आदर्शाला भारतीय ठरविले आहे व शेक्सपीअरच्या नायिका या दृष्टीने वेगळ्या आहेत असे दाखविले आहे, पण तरुणप्रेम - अनुताप - विशुध्द प्रेम असा विकासक्रम शाकुंतलात आहे हेच प्रा. राजवाडे यांनी अमान्य केले आहे. त्यांच्या दृष्टीने

शाकुंतलाचे एकंदर वातावरण धीरोदात्त नायक, मुग्ध नायिका व दैवामुळे त्यांना भोगाव्या लागलेल्या आपत्ती व त्यांचा निरास यांनी बनविलेले आहे. अद्‌भुत व दैवी वातावरणात घडलेला राजपुरुष - आश्रमकन्या - प्रणयप्रसंग असे शाकुंतलाचे स्वरुप आहे असे प्रा. राजवाडे म्हणतात.

प्रा. दि. के. बेडेकर म्हणतात की, प्रा. राजवाडे यांचे मत बरोबर आहे. कारण प्राचीन भारताच्या युग-मनाशी किंवा युग-धर्माशी सुसंगत असेच हे मत आहे. गटेने शाकुंतलाविषयी प्रकट केलेला अभिप्राय हेच दर्शवितो असे प्रा. बेडेकर यांना वाटते. लौकिक व स्वर्गीय यांचे मधुरमीलन शाकुंतलात आहे असे गटे म्हणतो. परिस्थितीशी एकाकीपणे झगडणारे व स्वर्गाशी वैर करणारे आधुनिक युरोपातील व्यक्तित्व व त्याची दारुण अशांती गटेने अनुभवली होती. त्याच्या मनाने या अशांतीचे अखंड दु:ख भोगले होते व वाळवंटामध्ये एखाद्याला उपवन गवसावे तसे शाकुंतलाच्या वाचनाने त्याचे झाले. प्रा. बेडेकर यांच्या मते टागोरही आधुनिक आहेत. म्हणजे त्यांचा युगधर्मही गटेच्या युगधर्माशी जुळणारा आहे, कालिदासाशी जुळणारा नाही. फरक एवढाच की, टागोर आधुनिक असून आधुनिक भारताच्या सामाजिक-राजकीय परिस्थितीमुळे प्राचीनाशी ‘समरस’ होऊ. (अवतरणचिह्न मुळातील) पाहात होते व गटेला आधुनिकत्व न सोडता प्राचीनाचे सौंदर्य पाहाणे शक्य झाले.

श्री. बापट यांच्या लेखाचा विचार करीत असताना वरील तिन्ही तत्वचिंतकांचे मौलिक विचार इथे नोंदवावेसे वाटले कारण यात व्यक्त झालेला व्यापक सांस्कृतिक संदर्भ आणि कलाकृतींचे सौंदर्यमूल्य ठरविण्याची उदात्त दृष्टी अजोड आहे.

श्री. बापट यांनी पात्रांच्या स्वभावाची रेखाटणी व मांडणी यासंबंधी जे विचार व्यक्त केले आहेत त्यातून मानवी मनासंबंधीचे त्यांचे सखोल चिंतन व्यक्त झालेले आहे. माणसाच्या हातून घडणाऱ्या कृतींचे दोन प्रकार त्यांनी स्पष्ट केले आहेत. १) स्वभावाच्या द्योतक कृती, २) तत्कालिक मन:स्थितीनुसार घडणाऱ्या कृती या विचारातील मानसशास्त्रीयता स्पष्ट आहे. स्व - भाव, मूळ पिंड हा प्रत्येकाचा विशिष्ट प्रकारचा असतो. तो त्याच्या व्यक्तिमत्वाचा पाया असतो. ते त्याचे मूळ स्वरुप असते. त्याच्या अलिकडे - पलिकडे माणूस फार जाऊ शकत नाही. प्रसंगपरत्वे तो स्वभावाहून वेगळा वागतो. त्याला तत्कालिक कारणे असतात.